**बातमी क्र. १**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधर गटामधून निवडून द्यावयाच्या दहा सदस्यांसाठी रविवार दि. २९ जानेवारी, २०२३ रोजी मतदान होत असून शनिवारी विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मतदानाचे साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे रवाना झाले. या निवडणूकीसाठी विद्यापीठ प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे.

रविवारी जळगाव, धुळे व नंदुरबार या तिनही जिल्ह्यातील २७ मतदान केंद्रावरील ६० बुथवर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या कालावधीत मतदान होणार आहे. एकूण २२ हजार ६६३ मतदारांची नोंदणी झालेली आहे. शनिवारी सकाळी या तिनही जिल्हयातील मतदान केंद्राकडे अधिकारी, कर्मचारी हे मतदान साहित्यासह वाहनाने रवाना झाले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी या वाहनांना झेंडी दाखविली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विनोद पाटील, निवडणूक विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, डॉ. मुनाफ शेख, निवडणूक विभागीय अधिकारी सीए रवींद्र पाटील, प्रा.अनिल डोंगरे, डॉ. दीपक दलाल, डॉ. सचिन नांद्रे, प्रा. के.एफ. पवार, प्रा. राम भावसार, प्रा. आशुतोष पाटील, डॉ. दिनेश पाटील, प्रा. अजय सुरवाडे. निवडणूक क्षेत्रीय अधिकारी ए.सी. मनोरे, जी.एन. पवार, एस.आर.गोहिल, इंजि. एस.आर. पाटील, व्ही.व्ही. तळेले., के.सी. पाटील, कपिल गिरी, मनोज निळे आदी उपस्थित होते.

मतदान प्रक्रिया सुरळीत व्हावी यासाठी ९ विभागीय अधिकारी, ८ क्षेत्रीय अधिकारी, ६० केंद्राध्यक्ष, आणि जवळपास ३७० मतदान अधिकारी व मतदान सेवक अशा कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. १० जागांसाठी २७ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. खुल्या संवर्गात ५ जागांसाठी ११ उमेदवार, इतर मागास संवर्गात १ जागेसाठी ३ उमेदवार, अनुसूचित जाती संवर्गात १ जागेसाठी ४ उमेदवार, अनुसूचित जमाती संवर्गात १ जागेसाठी २ उमेदवार, विमुक्त जाती / भटक्या जाती संवर्गात १ जागेसाठी ३ उमेदवार तर महिला संवर्गात १ जागेसाठी ४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

**मतदान केंद्र पुढीलप्रमाणे आहेत –**

**जळगाव जिल्हा**

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (दृकश्राव्य कक्ष प्रशासकीय इमारत १ बुथ)
२. मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (विवेकानंद भवन ८ बुथ)
३. पी.ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ (३ बुथ)
४. कला, वाणिज्य व मनोहरशेठ धारिवाल विज्ञान महाविद्यालय, जामनेर (५ बुथ)
५. श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर(१ बुथ)
६. बोदवड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड (१ बुथ)
७. धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (१ बुथ)
८. ज.जि.म.वि.प्र.चे कला, वाणिज्य व विज्ञान महा., यावल (१ बुथ)
९. रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय, रावेर(१ बुथ)
१०. प्रताप महाविद्यालय, अमळनेर (कनिष्ठ महाविद्यालय नवीन इमारत २ बुथ)
११. डी. एस. पाटील महाविद्यालय, एरंडोल (१ बुथ)

१२. प.रा. हायस्कूल सोसा.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव ( १ बुथ)
१३. कि.वि.प्र.संस्थेचे किसान कला, वाणिज्य व विज्ञान महा.,पारोळा (१ बुथ)
१४. एम. एम. महाविद्यालय, पाचोरा (१ बुथ)
१५. सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महा., भडगाव (२ बुथ)
१६. बी.पी. कला, एस.एम.ए. विज्ञान व के.के.सी. वाणिज्य महा., चाळीसगाव ( २ बुथ)
१७. महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महा., चोपडा ( १ बुथ)

**धुळे जिल्हा**

१८. झेडः बी. महाविद्यालय, धुळे (५ बुथ)
१९. व्ही. व्ही. एम संस्थेचे महाविद्यालय, साक्री (२ बुथ)
२०. एस. पी. डी. एम. महाविद्यालय, शिरपूर( ७ बुथ)
२१. एस. एस. व्ही. पी. एस. संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, शिंदखेडा(३ बुथ)
२२. श्रीमती पी.बी. बागल कला व वाणिज्य महाविद्यालय, दोंडाईचा (२ बुथ)

**नंदुरबार जिल्हा**

२३. जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार (४ बुथ)
२४. श्री.सु.व्हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर (१ बुथ)
२५. पुज्य साने गुरूजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा (१ बुथ)
२६. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा (१ बुथ)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २८ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

बातमी क्र. २

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) सूर्यनमस्काराच्या साधनेने शारीरिक लवचिकता तर वाढेतच मात्र एकाग्रता आणि स्मरणशक्तीमध्ये वाढ होऊन जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होतो असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी केले.

विद्यापीठातील योग मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित १०८ सूर्यनमस्कार साधना वर्गाच्या समारोप प्रसंगी प्रा. माहेश्वरी बोलत होते. या केंद्रातर्फे १८ ते २८ जानेवारी या कालावधीत सूर्यनमस्कार साधना वर्ग घेण्यात आले. रथसप्तमीच्या दिवशी या वर्गाचा समारोप झाला. सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरू माहेश्वरी म्हणाले की, आयुर्वेद आणि योगा ही भारतीय संस्कृतीची देण आहे. आयुर्वेदातील वनस्पती या नैसर्गिकरीत्या रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात तर योगा त्यास पुरक म्हणून काम करतात. सूर्यनमस्काराच्या साधनेने शारीरिक लवचिकता वाढून व्यक्ती मानसिकदृष्ट्या सक्षम होतात. विद्यार्थीदशेत जाणवणा-या ताणतणावाचे व्यवस्थापन करणे त्यांना सुलभ होईल असे ते म्हणाले. या केंद्राचे प्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजू आमले, आसमा तडवी, ललित गिरासे, या शिबिरार्थींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लीना चौधरी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंत गरूड, अश्विन सोनवणे, भगवान साळुंखे, रत्नाकर सोनार यांनी परीश्रम घेतले.

-------------------------------------------------------------------------------------------------------------------

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २८ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

**बातमी क्र. ३**

**प्रा. रामकृष्ण शिंदे यांची आयएसपीएस च्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चोधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील वरिष्ठ प्राध्यापक व संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. रामकृष्ण शिंदे यांची नुकतीच इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबीलीटी अँड स्टॅटिस्टिक (ISPS) सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणून दोन वर्षांसाठी बिनविरोध निवड झाली आहे. जानेवारीत कोचीन विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सोसायटीच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रा. शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. प्रा. शिंदे हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात १९९३ पासून कार्यरत आहेत व संख्याशास्त्र आणि ॲक्च्युरियल सायन्स विभागप्रमुख आहेत. त्यांचे संशोधन प्रॉबॅबिलीटी, इंडस्ट्रियल स्टॅटिस्टिक, पब्लीक हेल्थ स्टॅटिस्टिक, विमाशास्त्र, शिक्षण संख्याशास्त्र इत्यादी विषयांवर आहे.

जगभरात सध्या सर्व क्षेत्रात संख्याशास्त्राचे वाढते महत्व लक्षात घेता देशपातळीवर संख्याशास्त्राची व प्रॉबॅबिलीटीची आवड लहानपणीच विद्यार्थ्यांनमध्ये रूजवणे बाबत योजना व उच्च शिक्षणात विविध अभ्यासक्रमांमध्ये संख्याशास्त्राचा योग्य प्रमाणात आंर्तभाव करण्यासाठी कार्य करण्याचा डॉ. शिंदे यांचा मानस आहे. विद्यार्थ्यांमध्ये संख्याशास्त्राची आवड निर्माण करण्यासाठी प्रयोगातून संख्याशास्त्र शिकवणे व संख्याशास्त्राचा योग्य वापर करून शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नियमित प्रोजेक्टस् करून द्यावेत. तसेच संख्याशास्त्रातील अधिक माहितीसाठी शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल विद्यापीठ संख्याशास्त्र विभागात पूर्व नियोजनाने आखावी व माहिती घ्यावी असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले आहे.

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २८ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी